# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३१/२०१२-१३/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. याकुब अब्दुल शेख,<br>मु.पो. दरिकोणूर, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. याकुब अब्दुल शेख, मु.पो. दरिकोणूर, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची ' अ ' मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. २०.६.२०१२ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

तक्रारदार यांनी आपली शेती गट क्र. ९१/१ मध्ये ५ अश्वशक्ती वीज जोडणीसाठी वितरण कंपनीकडे चलन रु. ५०५०/- पावती क्र. ०२१३०७४ ने दि. ३०.१२.२०११ रोजी भरले आहे. ग्राहकाने दि. २९.१२.२०११ रोजी चाचणी अहवाला दिलेला आहे. कृती मानकानुसार लघुदाब वाहिनी विस्तार असलेने ३ महिन्यात वीज जोडणी मिळणे आवश्यक होते.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. १३.४.२०१२ रोजी तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. ७.६.२०१२ ला आदेश दिले त्यामध्ये कृती मानकानुसार विहित कालावधीत वीज पुरवठा द्यावा अन्यथा विलंबापोटी नुकसान भरपाई द्यावी असा आदेश दिला आहे. मंचाकडून अपेक्षित मदत - एका निश्चित कालावधीत वीज जोडणी देणेचा आदेश व्हावा, विलंब किती झालेला आहे हे निश्चित झालेस व मंचाने दिलेल्या आदेशानुसारच्या कालावधीत वीज जोडणी न मिळाल्यास ग्राहक भरपाई मागणेचा अधिकार तक्रारदारास आहे हे निश्चित व्हावे अशी मागणी केली आहे. अर्जासोबत चलन भरल्याच्या पावतीची व अंतर्गत कक्षाच्या आदेशाची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ९.७.२०१२ च्या लेखी अहवालात ग्राहकाने ५ अश्वशक्ती शेतीपंप वीज जोडणीसाठी अर्ज केल्याचे व दि. ३०.१२.२०११ रोजी चलन भरल्याचे व चाचणी अहवाल दिल्याचे मान्य केले आहे. सदर कनेक्शनसाठी लघुदाब वाहिनी ०.३६ कि.मी. लागते व त्याचा मंजुरी क्रमांक ईई/केएम/एसपीए/९५०२२७/१२०९/११-१२ असा आहे. सदर कनेक्शन हे ' महावितरण आपल्या दारी ' या विशेष योजनेतून मागणी करण्यात आली आहे. मार्च २०११ चे शेतीपंपाचे प्रलंबित ग्राहकांचे काम सद्या चालू आहे. सदरचे कनेक्शन मार्च २०११ नंतरचे असल्यामुळे देता आले नाही. ३१ मार्च २०११ पर्यंत पैसे भरुन चाचणी अहवाल दिलेले एकूण २८१ ग्राहक आहेत. म.रा. विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच इतर अटी ) विनियम २००५ कलम ४.४ अन्वये ' प्रथम येणाऱ्यास प्रथम ' या तत्वावर सदर ग्राहकांना वीज पुरवठा देण्याचे काम चालू आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २६.७.२०१२ रोजी सुनावणीस घेण्यात आली. सुनावणीचेवेळी ग्राहक गैरहजर, प्रतिनिधी नेमले नाहीत. मंचासमोर इतर प्रकरणात श्री. खापरे ग्राहक प्रतिनिधी उपस्थित. वि.प.तर्फे संख उप विभागाचे अधिकारी श्री. माणिक पेठे, कवठे महांकाळ विभागाचे श्री. एस.बी. पाटील, कनिष्ठ अभियंता उपस्थित. त्यांनी ग्राहकाचे ६ पोलचे काम आहे. ग्राहकास दि. १५.९.२०१२ पर्यंत वीज जोडणी देण्याचे कबूल केले. श्री. खापरे यांनी वि.प.ने ग्राहकास जर दि. १५.९.२०१२ पर्यंत वीज जोडणी दिली तर ग्राहक भरपाईची मागणी सोडून देत आहे, तसे ग्राहकास कळवित आहे असे मंचासमोर सांगितले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे एका निश्चित कालावधीत वीज जोडणी देण्याचे आदेश वि.प.विरुध्द करणे योग्य व कायदेशीर होईल काय ?

उत्तर : होय

## कारणमिमांसा

उभयबाजूंच्या लेखी कथनानुसार ग्राहकाने शेतीपंप वीज पुरवठा मागणी अर्ज करुन चलन भरल्याचे व चाचणी अहवाल दिल्याचे मान्य आहे. लघुदाब वाहिनी विस्तार असल्याने ३ महिन्यात वीज जोडणी देणे आवश्यक होते. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी ६ पोलचे काम आहे, ग्राहकास दि. १५.९.२०१२ पर्यंत वीज जोडणी देण्याचे मंचासमोर मान्य केले. वि.प.ने आपल्या लेखी अहवालात हवाला दिलेले विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ विचारांत घेतले असतां, मा. आयोगाने मंजूर केलेली कृती मानके दूर्लक्षित करावी लागतील हे ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांचे म्हणणे ग्राह्य धरण्यात येत आहे.

This document was created using Smart PDF Creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ चे कलम ८.२ नुसार मंच तक्रारदाराचे गाऱ्हाणे ठराविक मुदत दूर करण्याचे आदेश देऊ शकतो. अंतर्गत कक्षाने दि. ७.६.२०१२ ला कृती मानकानुसार विहित कालावधीत वीज पुरवठा द्यावा अन्यथा विलंबापोटी नुकसान भरपाई द्यावी असे आदेश दिले आहेत. ग्राहकाचे प्रतिनिधी श्री. खापरे यांनी दि. १५.९.२०१२ पर्यंत वि.प.ने वीज जोडणी दिल्यास विलंबापोटी निश्चित होणारी भरपाईची मागणी ग्राहक सोडून देत असल्याचे मान्य केले. मुद्दा क्र. १ चे उत्तर ' होय ' असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनी संख उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी तक्रारदार ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे त्यांची शेती गट क्र. ९१/१ मध्ये ५ अश्वशक्ती वीज जोडणी दि. १५.९.२०१२ पर्यंत द्यावी व त्याचा अहवाल मंचास सादर करावा.

३) ग्राहकाने वि.प.विरुध्द विलंबापोटी भरपाईची मागणी मागे घेतली आहे, त्यामुळे भरपाईचे वेगळे आदेश मंचाने दिले नाहीत.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com